# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे-२०१८/५१/५६८

दूरध्वनी: ०२२-२६६७७५५५

फॅक्स : ०२२-२६६६०२८७

Email : supdt@mahafireservice.gov.in

Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,**

महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,

विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,

सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८.

दिनांक : १० एप्रिल,२०१८.

प्रति,

आयुक्त, सर्व महानगरपालिका,

सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायती.

विषय : चित्रपटगृहांना मान्यतेचा प्रस्ताव सादर करताना संचालक, अग्निशमन सेवा, महाराष्ट्र शासन यांचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत..

संदर्भ : शासन पत्र, गृह विकास यांचे पत्र क्र.बीसीआर-०२१८/प्र.क्र.४५/विशा-५, दिनांक २८.०२.२०१८

***महोदय,***

शासन पत्र, गृह विकास यांचे पत्र क्र.बीसीआर-०२१८/प्र.क्र.४५/विशा-५, दिनांक २८.०२.२०१८ अन्वये गृह विभागाने महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन) नियम,१९६६ मधील नियम १०० खाली परवाना प्राधिकारी यांचेकडून परवाना देण्यासाठी संबंधीत चित्रपट गृहांमध्ये आग प्रतिबंधक व जीवसंरक्षण उपाययोजनांबाबत ना हरकत प्रमाणपत्र संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचेकडून घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

०२. शासन पत्र, गृह विकास यांचे पत्र क्र.बीसीआर-०२१८/प्र.क्र.४५/विशा-५, दिनांक २८.०२.२०१८ च्या पत्राची प्रत सोबत जोडली असून सदर प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

आपला विश्वासू,

**(प्र.सु.रहांगदळे)**

संचालक

महाराष्ट्र अग्निशमन सेवा

सहपत्र : वरीलप्रमाणे.

प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

मा.प्रधान सचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई-४०० ०३०.

सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे.

मुख्य अग्निशमन अधिकारी, सर्व महानगरपालिकांच्या अग्निशमन सेवा.

महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई
आवक क्र. 666
दिनांक 19 MAR 2018
फाईल क्र.
आवक लिपिकाची सही

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक : बीसीआर ०२१८/प्र.क्र.४५/विशा-५.
गृह विभाग, मुख्य इमारत,
दुसरा मजला, मंत्रालय,
मुंबई — ४०००३२.
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०१८.

प्रति,

संचालक,
अग्नीशमन सेवा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

Seen by :
Director :
S.I. :
O.S. :
Action by :

**विषय : चित्रपटगृहांना मान्यतेचा प्रस्ताव सादर करताना संचालक, अग्निशमन सेवा, महाराष्ट्र शासन यांचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत.....**

महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन) नियम, १९६६ मधील नियम १०० खाली चित्रपटगृह परवाना मंजूरीसाठी प्रस्ताव परवाना प्राधिकारी यांजकडून शासनास प्राप्त होत असतात. सदर प्रस्तावामध्ये अग्नीसुरक्षेच्या दृष्टीकोनातून आपले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. त्यानुसार संबंधित परवाना प्राधिकारी यांना महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन) नियम, १९६६ मधील नियम १०० खाली चित्रपटगृहांना प्रस्ताव पाठवताना आपले प्रमाणपत्र घेण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तरी यापुढे संबंधित परवाना प्राधिकारी यांजकडून चित्रपटगृहांना अग्नीसुरक्षेसंदर्भात प्रमाणपत्र देण्याबाबतचा प्रस्ताव आपल्या कार्यालयास प्राप्त झाल्यास सर्व अटी व शर्तींची पूर्तता झाली असल्याबाबतची संपूर्ण खातरजमा करुनच अग्नीसुरक्षेबाबतचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावी, हि विनंती.

(श. र. सावंत)
कक्ष अधिकारी, गृह विभाग.

प्रत माहितीसाठी :-

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
३. सर्व पोलीस आयुक्त,
४. सर्व जिल्हाधिकारी.